RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक १९(२)] शुक्रवार, फेब्रुवारी ९, २०२४/माघ २०, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक २९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

www.dnyanyatritantrasnehi.com

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ फेब्रुवारी २०२४.

### अधिसूचना

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा, २००९.**

क्रमांक आरटीई-२०१९/प्र.क्र.२५/एस.डी.-१.— बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा, २००९ (२००९ चा ३५) च्या कलम ३८ मधील उप कलम (१) आणि (२) नुसार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारास अनुसरून आणि यासंदर्भात इतर प्रदत्त शक्तीनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ सुधारित करण्यासाठी खालील नियम तयार करीत आहे ते म्हणजे :—

१. या नियमांस महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (सुधारित) नियम, २०२४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील नियम ४ (यापुढे सदर नियम असा उल्लेख करण्यात येईल.) उप नियम (५), नंतर खालील शर्तीचा समावेश करावा, जसे की :—

"परंतु असे की, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (वंचित व दुर्बल गटातील बालकांचे इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर कमीत कमी २५ टक्के प्रवेश करण्याची पद्धत) नियम, २०१३ नुसार वंचित व दुर्बल घटकातील २५ टक्के प्रवेशाकरीता ज्या खाजगी विना अनुदानित शाळेच्या एक किलोमीटर परिसरात शासकीय शाळा व अनुदानित शाळा आहेत अशी शाळा स्थानिक प्राधिकरणाकडून निवडण्यात येणार नाही."

३. नियम ८ च्या उप नियम (२), नंतर खालील शर्तीचा समावेश करावा, जसे की :—

"परंतु असे की, नियम ४ च्या उप नियम (५) खाली निवडण्यात आलेली कोणतीही खाजगी विना अनुदानित शाळा कलम १२ च्या उप कलम २ नुसार प्रतिपूर्तीकरिता पात्र ठरणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**तुषार महाजन,**
शासनाचे उप सचिव.

www.dnyanyatritantrasnehi.com

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguri Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 9th February 2024.

*NOTIFICATION*

RIGHT OF CHILDREN TO FREE AND COMPULSORY EDUCATION ACT, 2009.

No.RTE-2019/C.R.25/S.D.-1.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and *(2)* of section 38 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (35 of 2009) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education (Amendment) Rules, 2024.

2. In rule 4 of the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 (hereinafter referred to "as the principal rules"), after sub-rule (5), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, the Local Authority shall not identify the private un-aided school, for the purposes of 25 per cent. admission of disadvantaged group and weaker section under the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education (Manner of admission of Minimum 25% children in Class-I or Pre-school at the entry level for the children belonging to disadvantaged group and weaker section) Rules, 2013, where Government Schools and aided schools are situated within radius of one kilometer of that school."

3. In rule 8 of the principal Rules, in sub-rule (2), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, no private un-aided school which is identified under the proviso to sub-rule (5) of rule 4 shall be eligible for reimbursement under sub-section (*2*) of section 12."

www.dnyanyatritantrasnehi.com

By order and in the name of the Governor of Maharashtra

TUSHAR MAHAJAN,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.